International Journal of Advance and Applied Research (IJAAR)
Peer Reviewed Bi-Monthly
ISSN – 2347-7075
Impact Factor – 0.899
Vol.5 No.2 Nov–Dec 2017

# समकालीन साहित्य व शेतकरी समस्या

**प्रा. डॉ. पोळ हणमंत रामचंद्र**

राजा श्रीपतराव भगवंतराव महाविद्यालयात औंध

**प्रास्ताविक –**

समकालीन हा कालवाचक शब्द आहे. सम म्हणजे समांतर, सोबत. जे साहित्य आपल्या काळाबरोबर काळासोबत असते ते समकालीन .समकालीन म्हणजे विशिष्ट काळातील ,एकत्र असलेल असे ढोबळपणे म्हटले जाते. १९४५ नंतर मराठी साहित्यात नवसाहित्याचा उदय झाला. हे साहित्य आपल्या समकाळातील वास्तव जीवन मांडणारे साहित्य होते . दुसऱ्या महायुद्धातील भीषण विध्वंस, जीवित हानी, मानवी मूल्यांचा जाणवलेला फोलपणा , ईश्वराच्या अस्तित्वाविषयी संभ्रम यातून हे साहित्य निर्माण झाले. १९६० नंतरचे साहित्य खऱ्या अर्थाने समकालीन साहित्य मानले जाते . १९६० नंतर ग्रामीण तरुणांची नवशिक्षितांची संख्या मोठ्या प्रमाणात निर्माण झाली .जे ग्रामीण साहित्याच्या बाबतीत झाले तेच दलित साहित्याच्या बाबतीत घडले. १९६० नंतरच्या साहित्यात ग्रामीण ,दलित ,आदिवासी ,विज्ञान ,मुस्लीम, ख्रिश्चन साहित्य असे प्रवाह आले. या साहित्यात समाजातील बदललेली मूल्ये ,आदर्श यांचे परिणाम या काळातील साहित्यात येऊ लागले. स्वतंत्र्यप्राप्तीनंतर समाजाची मूल्ये बदलली. शिक्षणाचा प्रसार समाजातील सर्व स्तरात पोहचल्यामुळे समाजातील सर्व स्तरातील लोक शिक्षणाच्या प्रभावातून वाङ्मय निर्मिती करू लागले .त्यांनी आपापल्या अनुभूतीतून तत्कालीन विषय हताळले. हे विषय त्या काळातील होते.

**शोधनिबंधाचे उद्देश –**

१ समकालीन संकल्पना स्पष्ट करणे .

२ ग्रामीण साहित्यातील समकालीनता मांडणे .

३ या साहित्यातील शेतकऱ्यांच्या समस्यांचे स्वरूप स्पष्ट करणे .

**विवेचन –**

**समकालीन संकल्पना –**

समकालीन ही व्यापक संज्ञा आहे .समकालीन साहित्याचे स्वरूप नेम्केपणाने स्पष्ट करता येत नाही. समकालीनता ही स्वकालापुरती मर्यादित नसते . जगभरात समकालीन या संज्ञेचा वापर १९४५ सालापासून साहित्यात केला जातो .दुसऱ्या महायुध्दाच्या समाप्तीनंतर पाश्च्यात्य साहित्यात वापरण्यात आला .हळुहळू तो मराठी साहित्यात रूढ झाला.

समकालीनतेसंदर्भात मर्ढेकर .'सौदर्य आणि साहित्य 'या ग्रंथात लिहतात, ''काव्याप्रकृतीचा धर्म सृष्टीतल्या भावनानिष्ट सामतानता (emotional equivalances) शोधून काढणे .म्हणून नव्या काव्याचे लक्षण नव्या भावनानिष्ठ समतानतांचा आविष्कार.ह्या आविष्काराचे स्वरूप संकुचित आणि व्यापक अर्थाने उपमा –दृष्टांतासारखे असते. त्यामुळे ज्या क्षणी नवी प्रभावी प्रतिमासृष्टी काव्यात दृष्टोत्पत्तीस येते ,त्या क्षणी काव्याचे एक युग संपून दुसरे सुरु झाल्याची साक्ष पटते .१ " इथे समतानता हा शब्द समकाल या अर्थाने वापरलेला आहे .या अवतरणातून समकाल ही संकल्पना थोडी स्पष्ट होते .नव्या वाङ्मयीन प्रवाहात समकालीनता असते . समकालीन साहित्याला इंग्रजीत contemporary literature असे म्हटले जाते. विकिपीडियात साहित्यिक चळवळीबद्दल पुढीलप्रमाणे विधान करण्यात आले आहे , ''literary movements are always contemporary to the writer discussing the work of her day.2'' वरील अवतरण मर्ढेकरांच्या विधानाची पुष्टी करते .साहित्यिक चळवळी समकालीन समस्येतून ,स्थितीतून निर्माण होतात .

१९४५ च्या पुढील साहित्याला समकालीन साहित्य असे म्हटले जाते .१९२०ते १९४५ या काळातील साहित्याला आधुनिक हा शब्द वापरण्यात येतो .आधुनिक साहित्य समकालीन साहित्य असू शकते पण समकालीन साहित्य आधुनिक असेलच असे नाही .समकालीनतेत तात्कालिक संदर्भ असतात. समाजाला तात्कालीन संदर्भ महत्वाचे वाटतात .समकालीन साहित्य आपल्या काळाबरोबर ,काळासोबत असते. त्या काळाच्या समांतर असते. अशा साहित्यात त्या काळातील समाजातील लोकांची जीवन जगण्याची पद्धत ,रीती रिवाज ,भावनात्मकता , विचार , जाणीवा यांचे चित्रण आलेले असते .'खडक आणि पाणी' या ग्रंथात गंगाधर गाडगीळ लिहितात ,''समकालीन सामाजिक वा राजकीय समस्यांच्या विचारात काही लेखक उत्कटपणे व्यग्र झालेले असतात .काही जणांनी तर विशिष्ट नैतिक आणि राजकीय मूल्याचा स्थाने म्हणून स्वीकार केलेला असतो .३ ''गाडगीळ म्हणतात त्याप्रमाणे लेखक सामाजिक, राजकीय समस्या मांडत असतो .कुसुमाग्रज यांची 'क्रांतीचा जयजयकार 'ही कविता तत्कालीन सामाजिक तसेच राजकीय समस्या मांडते .समकालीन लेखक नवे संस्कार धारण करतो आणि वर्तमान जीवनाला अतिरिक्त ऊर्जा आणि समर्थ्य प्राप्त करून देतो .तसेच भविष्याची नवी वाटही दाखवतो .एकंदरीत समकालीन वास्तवाचे समग्र आणि आधुनिक दृष्टीकोनातून झालेले चित्रण ज्या साहित्यात असते,त्याला समकालीन साहित्य म्हणता येईल .एखादे साहित्य कोणत्याही काळात निर्माण झाले असले तरी आज आपणाशी संवाद साधत असेल तर ते समकालीन आहे असे म्हणता येते .

**ग्रामीण साहित्यातील समकालीनता –**

ग्रामीण म्हणता येईल अशी वाङ. मय निर्मिती १९२० पासून झाली असल्याचे दिसून येते .या साहित्याची वेगळी दाखल घेतली गेली नाही .याचे कारण म्हणजे मध्यवर्ती साहित्याच्या ज्या प्रेरणा होत्या त्याच या साहित्याच्याही होत्या .या साहित्यात सामकालीन प्रश्न दिसत नाहीत .यापूर्वीच्या महत्मा फुले यांच्या तृतीय रत्न ,शेतकऱ्याचा आसूड या साहित्यकृतीत समकालीन प्रश्न आढळतात पण या साहित्याला समकालील साहित्य म्हणण्यासाठी समकालीन ही संकल्पना त्या काळी मान्यता पावली नव्हती . १९४५ पासून समकालीन ही संकल्पना साहित्यजागतात चर्चिली जाऊ लागली .ग्रामीण साहित्यात समकालीनता किती प्रमाणात दिसून येते याबाबत भास्कर भोळे साहित्य अवकाश या ग्रंथात लिहितात ,''स्वातंत्र्याने या समाजात सुरु केलेल्या इष्टानिष्ट प्रक्रियांचे प्रतिबिंब आमच्या समकालीन साहित्यात उमटले आहे काय ?या प्रश्नाचे स्पष्ट नकारात्मक उत्तर देता येत नसले तरी ते फारच अपवादात्मक प्रमाणात उमटले आहे ,इतपतच

होकारात्मक देता येईल .४ ''भोळे यांचे म्हणणे खरे असल्याचे दिसून येते .कादंबऱ्यांचा विचार करता ‘डोंबाऱ्याचा खेळ’ ‘,वानवा’ ,’राडा’ ,’अंधारवाटा’ ,’किनारा’ ,’मार्केट’ ,’अशांत पर्व’ ,’तडजोड’ इत्यादी कादंबऱ्यात सामाजिक प्रक्रियेचे प्रतिबंब पूर्ण अर्थाने दिसत नाही .या कादंबऱ्यात अतिश्रीमंताचे जग येते .हे मुख्य प्रवाहासंदर्भात दिसणारे चित्र आहे .ग्रामीण साहित्याचा विचार करता फकिरा ,धग ,गोतावळा, तहान ,बारोमास या कादंबऱ्यात शेतकरी जीवनाचे प्रश्न मांडले आहेत .दुष्काळ ,भूक यामुळे ग्रामीण सर्वसामान्य माणसाला कोणत्या अवस्थेतून जावे लागते .याचे वास्तववादी रेखाटन या साहित्यकृतीत दिसते. ’धग’या कादंबरीत ग्रामीण सामान्य माणसाला किमान गरजा भागविण्यासाठी कोणत्या परिस्थितीला सामोरे जावे लागते .याचे वास्तवपूर्ण वर्णन या कादंबरीत केले आहे .’तहान ‘मध्ये दुष्काळाचे वर्णन ,’फकीरा ‘मध्ये ग्रामीण भागातील दलितांचे आर्थिक प्रश्न हे समकालीन सामाजिक वस्तुस्थिती कादंबऱ्यात रेखाटली आहे .अपवाद वगळता सर्वच साहित्यात सामाजिक स्थितीगतीचे चित्रण झाल्याचे आढळते .१९६० नंतर ग्रामीण साहित्याची चळवळ वाढू लागली .त्याचबरोबर सामजिक प्रश्नाला या साहित्याने भिडण्याचा प्रयत्न केला .या प्रयत्नातून समकालीन समस्यांची बदललेली मूल्ये ,आदर्श यांचे दर्शन या साहित्यातून घडू लागले .

**समकालीन ग्रामीण साहित्यातील शेतकऱ्यांच्या समस्या –**

स्वातंत्र्योत्तर काळात शेतकरी वर्गाचे प्रश्न बदलल्याचे दिसून येते .यांत्रिकीकरणानंतर शेतीवरील खर्च वाढला त्यातून समस्या निर्माण झाल्या .

१ रूढी ,परंपरा ,अंधश्रद्धा

२ यांत्रिकीकरणामुळे निर्माण झालेल्या समस्या

३ जागतिकीकरणामुळे निर्मण झालेल्या समस्या

४ शेतमजूराच्या अभाव मुळे निर्माण झालेल्या समस्या

५ तरुणांच्या बदलत्या मानसिकतेमुळे निर्माण झालेल्या समस्या

सर्वसाधारणपणे शेतकऱ्यांच्या वरील समस्या समकालीन साहित्यात ठळकपणे दिसून येतात .

**रूढी ,परंपरा, अंधश्रद्धा-**

समकालीन ग्रामीण साहित्यात रूढी ,परंपरा,अंधश्रद्धा यांचे वर्णन येते .आज शिक्षणाचे प्रमाण वाढले आहे. अंधश्रद्धा कमी झाल्या आहेत पण त्या संपल्या नाहीत .रूढी ,पाळल्या जातात .उत्तम बंडू तुपे यांच्या झुलवा. भस्म ,खुळी ,लांबलेल्या सावल्या या कादंबऱ्यात ,श्री .ना .पेंडसे यांच्या हद्दपार ,गारंबीचा बापू या कादंबऱ्यातून रूढी परंपरेचे दर्शन घडते .आजही या परंपरा ,अंधश्रद्धा चालू आहेत .’झुलवा’ उत्तम बंडू तुपे ’ चौडक’ राजन गवस यांच्या कादंबऱ्यात ग्रामीण भागात असलेल्या जोगत्यांच्या जीवनावर प्रकश टाकताना रूढी व अंधश्रद्धा यांचे वास्तववादी दर्शन घडविले आहे उत्तम बंडू तुपे यांच्या ‘खुळी ‘या कादंबरीत देवदेवस्कीचे वेड असणारी सासू ,’इजळ ‘मधील’किष्णाबाईच्या’अंगात येणे .’कळा’कादंबरीतील नारायण चव्हाण याचे गुप्तधनासाठी पोतराजाकडून प्रयत्न करणे .अशी उदाहरणे ग्रामीण साहित्यात विखुरलेली दिसतात .

समाजात आजही अंधश्रद्धा टिकून आहेत .मधु मंगेश कर्णिक यांची ‘देवकी ‘भाविणीची कथा आही. भावीनीच जीवन म्हणजे देवाच्या पायावर वाहिलेल फूल या या मानसिक परंपरेत वाढलेली देवकी या कादंबरीत आढळते ‘.कातळ ‘या कर्णिक यांच्या कादंबरीबद्दल रवींद्र ठाकूर मराठी कादंबरी सामाजशास्त्रीय समीक्षा या ग्रंथात लिहतात ,’अंधश्रद्धा,निष्क्रियता आणि दुसऱ्याचा दुस्वास करण्याची वृत्ती यांचा कातळ फोडण्याची जिद्द बाळगून कोकणात परतलेल्या दिगंबर आणि अवधूत यांच्या प्रयत्नांची कथा ‘कातळ ‘मध्ये

कर्णिक यांनी वर्णिली आहे .निसर्गाचे वरदान लाभलेले असूनही देवदेवस्की .रिकामपणाच्या गजाली आणि दुसऱ्यांचा दुस्वास यातच रमणाऱ्या कोकणी माणसाचा स्वभाव बदलल्याखेरीजकोकणात काही उभे राहू शकणार नाही हा साक्षात्कार झालेला अवधूत कोकणी समाजाचा नवा प्रतिनिधी आहे .५ " रवींद्र ठाकूर यांनी व्यक्तकेलेले मत कर्णिक यांच्या लेखनाबाबत असले तरी ग्रामीण भागातील रूढी ,परंपरा ,अंधश्रध्दा यांच्यावर प्रकश टाकणारे आहे . अंधश्रध्दा आजही टिकून आहेत .ग्रामीण कादंबरीत अजूनही यांचे उल्लेख आढळतात .शेतकऱ्यांच्या जीवनात यामुळे मोठी उलथापालथ घडून येताना दिसून येते .

**यांत्रिकीकरणामुळे निर्माण झालेल्या समस्या –**

यांत्रिकीकरणामुळे शेती करणे सुलभ झाले तसेच ते खर्चाचे झाले . यांत्रिकीकरण होण्यापूर्वी शेती करणे अत्यल्प खर्चाचे होते .पाणी काढण्यासाठी मोट होती .नांगरणी ,कुळपणी ,पेरणी बैलाच्या मदतीने केली जात होती त्यामुळे आर्थिक भार पडत नव्हता .ट्रक्टरच्या सहाय्याने शेती करण्यास जेव्हापासून सुरुवात झाली .तेव्हापासून नांगरणी ,पेरणी ,कुळपणी यासाठी डीझेलचा खर्च वाढला .पाणी काढण्यासाठी विजेच्या पंपाचा खर्च वाढला. संकरित बियाणांच्या वापरामुळे किटकनाशकाचा खर्च असे खर्च वाढले .आनंद यादव यांच्या 'झोंबी 'उत्तम तुपे यांच्या 'इजाळ 'श्रीराम कामात यांच्या 'भीष्माचा डोंगर 'सदानंद देशमुख यांच्या 'बारोमास 'भारत काळे'ऐसे कुणबी भूपाळ 'या कादंबऱ्यात यांत्रिकीकरणाचा परिणाम रेखाटला आहे .यांत्रिकीकरणामुळे ग्रामजीवनावर झालेल्या परिणामाबद्दल मराठी कादंबरी समाजास्त्रीय समीक्षा या ग्रंथात रवींद्र ठाकूर लिहितात ,"स्वातंत्र्योत्तर काळात महाराष्ट्राचे ग्रामजीवन झपाट्याने बदलत चलले आहे .शिक्षणप्रसार ,शहरीकरण ,आधुनिकीक सुधारणांचा व विचारांचा प्रसार .दलित समाजाला मिळालेले शासकीय संरक्षण यामुळे परंपरागत ग्रामीण मनाला हादरे बसत आहेत ." रवींद्र ठाकूर यांनी ग्रामजीवन झपाट्याने बदलाल्यचे म्हटले आहे .हा बदल यांत्रिकीकरणामुळे झाला आहे .

**शेतमजुराच्या अभावामुळे निर्माण झालेल्या समस्या –**

सरकारी योजना व शिधापत्रिकेवर अल्प दारात धान्य वितरण यामुळे शेतमजूर मिळेनासे झाले. यामुळे समस्या निर्माण झाल्या आहेत .मजुरीचे दर वाढले त्या प्रमाणात शेतमालाचे दर वाढले नाहीत. शेतमजूर कामासाठी ठेवणे अवाक्याबाहेर जाऊ लागले आहे .सरकारी कामे सातत्याने सुरु असल्याने मजूर मिळणे अवघड बनले आहे .यामुळे समस्या निर्माण झाल्या आहेत .काही पिके वेळेत निघणे गरजेचे असते. ती न निघाल्यामुळे शेतकऱ्यांच्या नुकसानीचे प्रमाण वाढले .शेतमजुरीचे प्रश्न 'कुणाच्या खांद्यावर 'बा .ग केसकर ,'कोयता 'सरदार जाधव 'शेवती ''चिपाड 'उत्तम बंडू तुपे यांच्या कादंबऱ्यात आले आहेत .

**तरुणांच्या बदलत्या मानसिकतेमुळे निर्माण झालेल्या समस्या –**

शेती परवडत नसल्यामुळे शेतकऱ्याच्या मुलांना शेतीविषयी प्रेम राहिले नाही .नोकरी करण्याकडे त्याची मानसिकता आहे .मुलींना शेतकरी नवरा नको वाटतो . मुलींची संख्या कमी असल्यामुळे लग्नाचे वेगळेच प्रश्न निर्माण झाले आहेत .महेद्र कदम यांची 'आगळ 'व सदानंद देशमुख यांची 'बारोमास 'ही कादंबरी तरुणांच्या बदलत्या मानसिकतेचे स्वरूप प्रकट करतात .शेती न करण्याच्या मानसिकतेमुळे प्रश्न निर्माण झाले आहेत .हे प्रश्न न सुटणारे आहेत .काही वृध्द शेतकऱ्यांच्या समोर गंभीर समस्या निर्माण झाली आहे .

**निष्कर्ष –**

१ साहित्य कोणत्याही काळात निर्माण झाले असले तरी ते आज आपणाशी संवाद साधत असेल तर ते समकालीन ठरते .

२ समकालीन साहित्यात रूढी ,परंपरा ,अंधश्रद्धा यामुळे शेतकऱ्यांच्या जीवनात आलेल्या समस्यांचे वर्णन आढळते .

३ यांत्रिकीकरणामुळे शेतकरी कर्जबाजारी झाले ,आर्थिक पाठबळ नसल्याने शेती करणे अवगढ बनत चालले आहे .

४ सरकारने मान्नरेगा सारख्या योजना आखल्यामुळे शेतमजूर मिळणे समस्या बनली आहे .

५ तरुण पिढी शेती करण्यास उत्सुक दिसत नाही .त्यामुळे शेती कशी करावी हा प्रश्न काही शेतकऱ्यांच्या समोर उभा आहे .

**संदर्भ –**

१ .मर्ढेकर बा .सी ,'सौंदर्य आणि साहित्य ',मौज प्रकाशन , तिसरी आवृत्ती ,मुंबई , ,१९७५ . पृ .१३८.

२ https:en.m.wikipedia.org>wiki ,date 15-01-2023, page no 1

३ गाडगीळ गंगाधर ,खडक आणि पाणी ,उत्कर्ष प्रकाशन ,पुणे ३० ,तिसरी आवृत्ती ,फेब्रुवारी १९८५, पृ.७२

४ भोळे भास्कर ,साहित्य अवकाश ,साकेत प्रकाशन .औरंगाबाद ,पहिली अवृत्ती २००९ ,पृ .१९

५ ठाकूर रवींद्र ,मराठी कादंबरी समाजशात्रीय समीक्षा ,दिलीपराज प्रकाशन पुणे ,प्रथम आवृत्ती , पृ ३०७,३०८

६ ठाकूर रवींद्र ,मराठी कादंबरी समाजशात्रीय समीक्षा ,दिलीपराज प्रकाशन पुणे ,प्रथम आवृत्ती , पृ ३२४